दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ बुधवार, ०६ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : १९ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353


## 'मी राजीनामा देणार नाही'

### ममता बॅनर्जी यांचं पराभवानंतर मोठं विधान, निवडणूक प्रक्रियेवरही गंभीर आरोप



महाराष्ट्र जीत

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी (Mamata Banerjee) यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्यांनी सांगितलं की, त्या पराभूत झालेल्या नाहीत आणि नैतिकदृष्ट्या त्यांचाच विजय झाला आहे. "मी राजीनामा देणार नाही, द्यायचा प्रश्नच उद्भवत नाही," असं त्या ठामपणे म्हणाल्या.

**निवडणूक आयोगावर केला आरोप :** ममता बॅनर्जी यांनी म्हटलं, "आमची लढाई भाजपाशी नव्हती, तर निवडणूक आयोगाशी होती. माझ्या आयुष्यात मी असा निवडणूक प्रकार कधीच पाहिला नाही. 2004 नंतर इतका अत्याचार मी पाहिलेला नाही. निवडणूक आयोग हा मुख्य खलनायक आहे. एसआयआरमुळे 90 लाख मतं काढून टाकली गेली. भाजपाने 100 जागांची लूट केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी मिळून आम्हाला हरवले. भाजपाने प्रत्येक प्रकारचा डावपेच वापरून आम्हाला पराभूत केले. भाजपा कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली."

**आमच्या लोकांना मारहाण केली :** ममता बॅनर्जी म्हणाल्या, "मतमोजणीच्या पहिल्या फेरीनंतर ते म्हणू लागले की, भाजपला 195-200 जागा मिळत आहेत. तुम्ही अंतिम निकालाची वाट पाहिली नाही. तुम्ही 5-6 फेऱ्यांची सुद्धा वाट पाहिली नाही. पत्रकार आणि माध्यमांनी केलेल्या त्या प्रचारानंतर भाजपाचे उमेदवार मतदान केंद्रात घुसले आणि त्यांनी लोकांना, मतमोजणी प्रतिनिधींना मारहाण करण्यास सुरुवात केली. जेव्हा मला कळलं की सर्व मतमोजणी प्रतिनिधींना हटवण्यात आले आहे, तेव्हा मी सुमारे 30,000 मतांनी आघाडीवर होते आणि अजून 5 फेऱ्या बाकी होत्या. आम्हाला 32,000 पेक्षा जास्त मते मिळायला हवी होती. त्यानंतर भाजपाचे उमेदवार 200 सीआरपीएफ जवान आणि 200 बाहेरील गुंडांना घेऊन आत गेले आणि त्यांनी आमच्या लोकांना मारहाण केली. महिलांनाही सोडले नाही आणि त्यांनी सर्व अर्ज हिसकावून घेतले."

## विक्रोळी पार्कसाईट येथे भाजपाचा विजयी जल्लोष



महाराष्ट्र जीत

**घाटकोपर, (केतन भोज) :** पश्चिम बंगाल,आसाम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत विजयाचा आनंद विक्रोळी पार्कसाईट जांभळी नाका येथील वॉर्ड क्र .१२३/१२४ भाजपा कार्यालयात भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मिठाई वाटप व घोषणाबाजी करत भाजपा कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी भाजपाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मान्यता नसलेल्या शाळेत प्रवेश घेवू नका - गट शिक्षणाधीकारी श्रीकांत माने

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड :** ज्या शाळांना शासन मान्यता नाही अशा शाळेत पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेवू नका असे आवाहन कारंजा गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांनी नुकतेच केले आहे .



वृत्त असे की शहरातील शिक्षण व्यवस्थेबाबात गंभीर प्रकार समोर आला असून कारंजा पंचायत समीतीच्या शिक्षण विभागाने मान्यता नसलेल्या शाळे विरोधात पालकांना इशारा दिला आहे . एस के लॉन समोर एच बी प्री प्रायमरी स्कूल या नावाने केवळ पूर्वप्राथमिक शाळेचा फलक लावलेल्या शाळेत प्रत्यक्षात इयत्ता पहीली ते सातवी पर्यन्त विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु असल्याचे उघडकीस आले आहे .

शिक्षण विभागाचे तपासणीत समंधीत शाळेला शासनाची अधिकृत कोनतीच मान्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे . त्यामुळे अशा अनधिकृत शिक्षण संस्थेमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याली भीती व्यक्त केली जात आहे .तेव्हा शासनाची शाळा मान्यता नसलेल्या अनधिकृत शाळेत पालकांनी आपल्या पाल्याचा कोनत्याही इयत्तेत प्रवेश घेवू नये असे आवाहन कारंजा गट शिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांनी केले आहे . प्रवेश प्रक्रीयेबाबत किवा शाळांबाबत कोणतीही शंका अथवा अडचण वाटल्यास पालकांनी पंचायत समीती शिक्षण विभाग यांचेशी थेट संपर्क साधावा असेही माने यांनी स्पष्ट केले आहे .

## खोट्या खंडणी प्रकरणाला न्यायालयाची चपराक!

### बॉम्बे हायकोर्ट नागपूर खंडपीठाचा धडाकेबाज निर्णय; एफआयआर व चार्जशीट रद्द

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे / महागांव :**

खंडणी आणि धमकीच्या आरोपाखाली दाखल करण्यात आलेल्या कथित खोट्या गुन्ह्याला अखेर न्यायालयाने जोरदार चपराक दिली आहे. दि. २८ एप्रिल २०२६ रोजी बॉम्बे हायकोर्ट ने ठोस पुराव्याअभावी संपूर्ण एफआयआर, चार्जशीट आणि आरसीसी प्रकरण रद्द केले.

हा महत्त्वपूर्ण निर्णय न्यायमूर्ती वृषाली व्ही. जोशी यांनी दिला असून, तपास यंत्रणांच्या कामकाजावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**प्रकरण काय होते?**

दि. २३ जानेवारी २०२३ रोजी महागांव पोलीस ठाण्यात शुंभम सांगडे, सुनील बेलखेडे, समाधान कदम, प्रशांत शिंदे आणि सुनील भालेराव यांच्याविरुद्ध आयपीसी कलम ३८४, ५०४, ५०६ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तक्रारदाराने ५० हजार रुपयांची खंडणी मागितल्याचा आणि बदनामीची धमकी दिल्याचा आरोप केला होता.

**न्यायालयाचे ठाम निरीक्षण**

न्यायालयाने कागदपत्रे व साक्षीदारांचे जबाब तपासल्यानंतर स्पष्ट शब्दांत नमूद केले —

**ना ठोस धमकी, ना पैशांचा व्यवहार — मग खंडणी कुठून आली?**

**न्यायालयाचे मुख्य मुद्दे:**

१) खंडणीसाठी भीती निर्माण करून पैसे उकळणे आवश्यक

२) या प्रकरणात तसा एकही ठोस पुरावा नाही

३) केवळ उपोषणाची धमकी देणे हा गुन्हा ठरत नाही

यामुळे संपूर्ण गुन्हा "कागदोपत्री" असल्याचे स्पष्ट झाले.

**संपूर्ण कारवाई रद्द**

न्यायालयाने आरसीसी क्रमांक ३५/२०२६ सह सर्व गुन्हेगारी कारवाई थेट रद्द केली.

**तपास यंत्रणांवर सवाल**

या निकालामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे —

केवळ आरोपांवर गुन्हे दाखल करून लोकांची प्रतिमा मलीन केली जाते का?

न्यायालयाने स्पष्ट संदेश दिला —

"पुरावे नसतील तर गुन्हेही नाहीत!"

**समाधान कदम यांची प्रतिक्रिया**

"आमच्यावरचा खोटा गुन्हा रद्द झाला, हा आमच्यासाठी मोठा दिलासा आहे. वैयक्तिक आकसातून गुन्हे दाखल करून कोणाचीही प्रतिमा खराब करता येत नाही, हे न्यायालयाने दाखवून दिले," असे समाधान कदम यांनी सांगितले.

**थेट संदेश**

■ खोट्या तक्रारींना आळा बसण्याची शक्यता

■ पुराव्याशिवाय गुन्हे दाखल करणे धोकादायक

■ न्यायालयाचा स्पष्ट इशारा – कायद्याचा गैरवापर सहन केला जाणार नाही!

## रिपाई आठवले गटाच्या वतीने बुलढाणा ठाणेदार संग्राम पाटील यांचा बाबासाहेब जाधव यांनी केला भव्यदिव्य सत्कार

महाराष्ट्र जीत

**बुलढाणा,(प्रतिनिधी)-** मातृतीर्थ बुलडाणा शहर पुलीस ठाण्याचे नवनियुक्त धाडसी व शिस्तप्रिय पोलीस अधिकारी खमक्या, दबंग अधिकारी म्हणून ओळख असलेले ठाणेदार संग्राम पाटील यांची बुलडाणा शहर पुलीस ठाण्याच्या ठाणेदार पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी पदभार स्वीकारताच शहरातील गुन्हेगारी विश्वात एकच खळबळ उडाली आहे. अशा संविधानीक मार्गाने चालणाऱ्या पोलीस सेवेत 15 वर्षाहून अधिक काळामध्ये उल्लेखनीय सेवा केलेल्याबद्दल त्यांना पोलीस महासंचालक पदाने सन्मानित केले आहे अशा कर्तव्यदक्ष ठाणेदार संग्राम पाटील यांचा बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाच्या वतीने बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, भिमरत्न पुरस्कार प्राप्त समाजभूषण ज्येष्ठ नेते प्रा.इंजि. भैयासाहेब पाटील, रिपाइं विदर्भ कार्यध्यक्ष बुलडाणा जिल्ह्याची तोफ पॅंथर मुरलीधरजी गवई,दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे प्रदेशप्रवक्ते आदर्श शिक्षक निरंजन जाधव, मराठा



संघाचे ज्येष्ठ नेते रामभाऊ शिंदे, रिपाइं जिल्हा अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हा प्रमुख नबाब मिर्झा बेग, महासचिव निळकंठदादा सोनोने,जिल्हा कार्यध्यक्ष प्रा. मुक्तार पठाण सर, महीला जिल्हाध्यक्ष वंदनाताई वाघ,रोशनीताई कबीरदास,जिल्हा संघटक संपर्क प्रमुख इंजि.शरद खरात, जिल्हा युवाध्यक्ष प्रकाश पाटील (म्हस्के), विदर्भ महीलाउपाध्यक्षा आशाताई वानखडे, जिल्हाउपाध्यक्ष भगवान इंगळे,भाऊसाहेब वानखडे,इंजि. राजेश सरकटे,विदर्भ उपाध्यक्ष रामेश्वर वाकोडे, विदर्भ सचिव दलीत मित्र विजय सपकाळ, सर्वश्री तालुकाध्यक्ष बुलडाणा केशवराव सरकटे, मोताळा बाळासाहेब आहीरे, चिखली हीम्मतराव जाधव, भानुदास शेजूळ सिं.राजा, सरपंच रामदास कहाळे,पत्रकार विजय भालमोडे, रमेश पिंपळे,देऊळगाव राजा प्रदिप मुखदयाल,आकाशभैया साळवे, सुधीरदादा हिवाळे,मेहकर राणा मोरे, फौजी राहुल अवसरमोल, लोणार समाधानजी सरदार, मलकापूर दिलीप इंगळे,नांदुरा पत्रकार शैलेश वाकोडे, जळगाव जामोद संतोष वानखडे, संग्रामपूर बाबूलाल इंगळे, शेगाव विलास गव्हांदे, बुलढाणा तालुकाउपाध्यक्ष इंजि. भास्करराव जाधव, आल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष सैय्यद नाजीम, जिल्हा महासचिव विजय साबळे सम्राम पाटील यांचा पुष्पगुच देऊन त्यांच्या शासकीय पोलीस स्टेशन कार्यालयात यथोचित सत्कार केला व त्यांना पूढील भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. नंतर सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांचा परिचय बाबासाहेब जाधव यांनी करून दिला.

संग्राम पाटील हे मुळचे नाशिक जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील असलेले लहान पणापासून अभ्यासू वृत्ती असल्यामुळे त्यांनी कठीण असी कृषी शाखेची एमएससी पदी संपादन केलेकृषी शाखेचे पदवीधर झाले. अभ्यासू वृत्ती असल्याने त्यांनी जिद्दीने व चिकाटीने मेहनतीच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा सेवा आयोगाचा अभ्यास केला व पहील्याच प्रयत्नात सर्वोच्च गुण मिळवून उत्तीर्ण झालेले व सन 2008 मध्ये पोलीस निरीक्षक म्हणून निवड त्यांची पोलीस सेवेत रूजू झाले.पुणे ग्रामीण, मुंबई शहर पोलीस दल,बुलढाणा चिखली,साखरखेडा,धाड, धामणगाव बढे इत्यादी ठिकाणी ठाणेदार पदी उल्लेखनीय कार्य केले धाड, चिखली सारख्या संवेदनशील परिसरात त्यांनी कायदा, शांतता सुव्यवस्था कायम टिकवून राहावी यासाठी सोशल पोलिसिंग पध्दत त्यांनी अवलंबिली होती, कोणताही अवाजवी हस्तक्षेप, दबाव याला न जुमानता नि:पक्ष संविधानीक कायद्याच्या चौकटीत राहून सामान्य व गरजू लोकांना त्यांनी न्याय मिळवून दिला असी आज पर्यंत ख्याती आहे. पोलीस पाटील, शांतता समिती व सामाजिक कार्यकर्ते तसेच लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ पत्रकार यांचे सोबत समन्वय ठेवून त्यांनी विधायक उपक्रम राबविले पत्रकार मित्र म्हणून ओळख असलेले नवनियुक्त बुलढाणा शहराचे ठाणेदार संग्राम पाटील हे धाडसी व शिस्तप्रिय पोलीस अधिकारी म्हणून जिल्ह्यात त्यांची ख्याती आहे. बुलडाणा शहराचा पोलीस ठाण्याचा कारभार त्यांच्या हाती आल्याने,शहरातील गुन्हेगारीवर कडक नियंत्रण येणार, कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवत गुन्हेगारांना वचक बसवणारा खमक्य ठाणेदार म्हणून संग्राम पाटील यांच्याकडून बुलडाण्यात दमदार कामगिरीची अपेक्षा नागरिकांमध्ये आशा व्यक्त होत आहे.

सत्कार प्रसंगी पत्रकार बाबासाहेब जाधव यांनी सांगितले की,आरपीआय आठवले गटाचे आपल्या चांगल्या कामासाठी संपूर्ण सहकार्य राहील व पुढील भावी वाटचालीस रिपाइं तर्फे शुभेच्छा दिल्या व शुभ कामना केली.

सत्कारास उत्तर देतांना म्हणाले की, चांगल्या कामासाठी तुम्ही केव्हाही या तूमच्या साठी माझ्या कार्यालयाचे चोविस तास दरवाजा उघडा आहे. तूमच्या कडून सहकार्याची व चांगल्या कामाची मला अपेक्षा आहे.

## मेळघाटात बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात 'निसर्ग अनुभव' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद;

### 33 वाघ आणि शेकडो वन्यजीवांचे पर्यटकांना दर्शन

महाराष्ट्र जीत

**संजय वानखेडे अमरावती, :** निसर्ग प्रेमी ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते, असा 'निसर्ग अनुभव' उपक्रम 1 मे 2026 रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पर्वावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उत्साहात पार पडला. पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात सलग 12 तास घनदाट वनातील 264 मचाणांवर रात्रभर बसून पाणवठ्यावर येणाऱ्या वन्य प्राण्यांच्या निरीक्षणाचा थरारक अनुभव निसर्गप्रेमींनी मनमुरादपणे लुटला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट वन्यजीव, अकोला आणि पांढरकवडा या सहा वन्यजीव विभागांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला होता. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, यवतमाळ, औरंगाबाद, अकोला, अमरावती या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश आणि तेलंगणा राज्यातूनही पर्यटकांनी मोठ्या संख्येने गुगल फॉर्मद्वारे नोंदणी केली होती.





या रोमांचक मोहिमेत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य क्षेत्रात 30 वाघ, 16 बिबट, 110 अस्वल, 413 रानगवा, 856 सांबर आणि 121 नीलगाय या वन्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. तसेच पांढरकवडा वन्यजीव विभागात 3 वाघ, 2 बिबट, 164 रानडुक्कर, 25 अस्वल, 67 नीलगाय व 153 चितळ दिसून आले. अकोला वन्यजीव विभागातही 16 बिबट, 25 अस्वल, 2 तडस, 23 कोल्हा, 60 रानडुक्कर, 202 चितळ आणि 365 नीलगाय असे वैविध्यपूर्ण वन्यजीव पर्यटकांच्या दृष्टीस पडले. मचाणावर बसण्यापूर्वी संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पर्यटकांना आवश्यक सूचना दिल्या होत्या आणि प्रत्येक निसर्गप्रेमीसोबत सुरक्षेसाठी वन कर्मचारी व निरीक्षणासाठी पत्रक देण्यात आले होते.

रात्रीच्या वेळी जंगलात शांतता, रातकिड्यांची किरकिर आणि हवेची झुळूक अशा नैसर्गिक वातावरणात वन्यजीवांना जवळून पाहणे, हा पर्यटकांसाठी एक विलोभनीय अनुभव ठरला. पौर्णिमेच्या प्रकाशात उजळलेले मेळघाटचे घनदाट जंगल आणि प्राण्यांचे आवाज यामुळे सहभागी पर्यटक भारावून गेले होते. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल आणि वनविभागाच्या सहकार्याबद्दल पर्यटकांनी समाधान व्यक्त करत, वाघांना व इतर वन्यजीवांना नैसर्गिक अधिवासात अनुभवल्याचा विशेष आनंद व्यक्त केला आहे.

## संपादकीय

### पाणी की पेट्रोल?

मुदलात पाण्याचीच टंचाई भेडसावणार असेल तर हाती असेल ते पाणी प्यायला, शेतीला आणि उद्योगांसाठी वापरावयाचे की ते मोटारींच्या इंधननिर्मितीसाठी वळवायचे?

गेल्या आठवड्यात केंद्र सरकारने भारतातील मोटारी १०० टक्के इथेनॉलवर चालवण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. एरवी सर्वसाधारण परिस्थितीत सरकारचा हा निर्णय अभिनंदनास पात्र ठरला असता. पण आताची परिस्थिती सर्वसाधारण नाही. इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारी नेतान्याहू यांच्या युद्धखोरीमुळे पश्चिम आशिया पेटला असून त्यामुळे जगभरातच इंधनाची अभूतपूर्व टंचाई निर्माण होताना दिसते. पश्चिम आशियाचे वाळवंट हे खनिज तेलाचे माहेर. तेथील परिस्थिती अद्याप तणावाची असल्याने या खनिज तेलाच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणावर व्यत्यय निर्माण झाला असून एखादा अमेरिकेसारखा अपवाद वगळता सर्वांच्याच पोटाला त्यामुळे चिमटा बसत आहे. हे असेच सुरू राहिले तर इंधनाची अधिक टंचाई निर्माण होणार. तिला तोंड देण्याचा एक मार्ग म्हणून पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व सरकार कमी करू पाहाते. मोटारीच्या इंधनात ८५ टक्के इथेनॉल मिसळणे, पुढे जात १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या मोटार उत्पादनांस गती देणे हे याच प्रक्रियेचा भाग. याबाबतची सर्व प्रक्रिया यथास्थितपणे पूर्ण झाली तर पेट्रोल वा डिझेल यांचा एक थेंबही न घालता पूर्णपणे इथेनॉलवर धावणाऱ्या मोटारी आपल्याकडे बाजारात येऊ शकतील. सर्वसाधारण परिस्थितीत या अशा निर्णयाचे स्वागत करता आले असते. आता ते करणे म्हणजे तहान लागल्यावर विहीर खणण्यास घेण्याचे कौतुक करणे. ते अवघड. तहानेप्रमाणे ऊर्जेची गरज कधीही वाढू शकते असा विचार करून आधीपासूनच तिची बेगमी करावी लागते. हा निर्णय या किमान सामान्यज्ञानास अपवाद. म्हणून त्याविषयी बरे बोलता येणे अवघड. शिवाय दुसरे असे की सद्य:स्थितीत या निर्णयाचे दोन गंभीर दुष्परिणाम संभवतात. त्यांची दखल घेणे अगत्याचे.

पहिला मुद्दा आगामी पावसाळ्याबाबत. हवामान खाते आणि अन्यांच्या अंदाजानुसार यंदा पाऊस हात आखडता घेईल असे दिसते. अधिकृत अंदाज तर सरासरीच्या आठ टक्के इतकी घट दाखवतो. त्यामुळे केंद्रापासून ते नगरपालिकांपर्यंत सर्वांनीच पाण्याच्या बचतीचे नियोजन सुरू केले आहे. मुंबईसारख्या महापालिकेने तर पाणीकपातीचा निर्णयही जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर इथेनॉल वापरास गती देण्याच्या निर्णयाचा विचार करायला हवा. कारण इथेनॉलनिर्मितीसाठी महाप्रचंड प्रमाणावर पाणी लागते. जुन्या पद्धतीने तयार करू गेल्यास एक लिटर इथेनॉल तयार करावयाचे तर १० हजार लिटर पाणी जाळावे लागते. तांदूळ वा मका यापासूनच इथेनॉलनिर्मिती या तुलनेत जरा बरी. म्हणजे तेथे एक टनापासून ४७५ लिटर इतके इथेनॉल बनते. तथापि आपल्याकडे ऊस हे आपल्या इथेनॉलनिर्मितीचे पारंपरिक साधन. एकट्या महाराष्ट्रात जवळपास ३५० साखर कारखान्यांनी इथेनॉलनिर्मितीत मोठी गुंतवणूक केली. एक टन- म्हणजे एक हजार लिटर- उसाच्या रसापासून फक्त ७० लिटर इतकेच जेमतेम इथेनॉल हाताशी येते. म्हणजे आधी प्रचंड पाणी पिणारा ऊस पिकवा, तो पिकल्यावर तितक्याच प्रचंड उष्णतेने त्याच्या रसापासून इथेनॉल तयार करा असा हा मार्ग. पैसे मिळवण्यासाठीदेखील पैसे खर्च करावे लागतात असे म्हणतात. त्याप्रमाणे ऊर्जानिर्मितीसाठीही ऊर्जा खर्च करावी लागते. पण ती कशी आणि कोणत्या मार्गाने करावयाची हा प्रश्न. तो सद्य:स्थितीत पडतो कारण मुदलात पाण्याचीच टंचाई भेडसावणार असेल तर हाती असेल ते पाणी प्यायला, शेतीला आणि उद्योगांसाठी वापरावयाचे की ते मोटारींच्या इंधननिर्मितीसाठी वळवायचे याचा विचार करावा लागेल. तो केल्यास उत्तर काय असेल ते स्पष्ट आहे. सध्याची आणीबाणी निर्माण होण्यापूर्वी केंद्राने इथेनॉलनिर्मितीसाठी उत्तेजन दिले. त्यातून अनेकांनी इथेनॉलनिर्मितीची क्षमता वाढवली वा त्यासाठी नवे प्रकल्प उभे केले.

# नायगाव येथे दशपर्णी अर्क महोत्सव उत्साहात साजरा

महाराष्ट्र जीत

**मंठा : प्रतिनिधी ज्ञानेश्वर पवार :** तालुक्यातील नायगाव येथे दशपर्णी अर्क महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या प्रतिमेस हार अर्पण करून व श्रीफळ फोडून कार्यक्रमाचे उद्घाटक तालुका कृषी अधिकारी श्री दयानंद वाघमोडे,प्रमुख पाहुणे बंडू नाना देशमुख,

मंडळ कृषी अधिकारी विनोद खोबरे,गटाचे अध्यक्ष अविनाश राठोड,तालुका व्यवस्थापक आत्मा राजेश्वर मोहाडे,

उमेदचे अभियान व्यवस्थापक सागर टाकणकर,प्रभाग समन्वयक समाधान आघाम,पाणी फाउंडेशनचे बाळासाहेब चव्हाण,महादेव निपाणे ई हस्ते झाले.ता.कृषी अधिकारी वाघमोडे शेतकऱ्यांना बोलताना म्हणाले की, दशपर्णी अर्क महोत्सव आयोजित केल्याबद्दल रयत शेतकरी गटाचे त्यांनी अभिनंदन केले.200 लिटर दशपर्णी आर्क तयार करण्यासाठी दहा झाडाचा हिरवा पाला 2 किलो आणि दहा लिटर गोमूत्र,तीन किलो गाईचे शेण,दोन किलो हिरवी मिरची ठेचा आणि 500 ग्रॅम ठेचलेली लसूण,हे मिश्रण एक ड्रम 30 ते 35 दिवस सावलीत ठेवून हा अर्क तयार करता येईल. हे अर्क तयार



करायला कोणताही आर्थिक झळ किंवा हानी शेतकऱ्याला बसत नाही,आळ्या आणि किड्यांचा नायनाट करण्यासाठी हे अर्क उपयुक्त आहे असे त्यांनी सांगितले.

ता.अभियान व्यवस्थापक उमेद चे सागर टाकणकर सर व समाधान आघाम सर यांनी शेतकऱ्यांना दशपर्णी अर्क विषयी सखोल माहिती देऊन उमेद महिलांना आणि शेतकऱ्यांना गट बांधणीसाठी आपण पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

आत्मा गटाचे व्यवस्थापक राजेश्वर मोहाडे यांनी अभिनेता आमिर खान ला भेटण्यासाठी पाणी फाउंडेशन ने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीचे अवलंब करावे.आणि विषमुक्त शेतीसाठी दशपर्णी, निमार्क आणि जीवामृत चा आपल्या शेतामध्ये वापर करावा असे त्यांनी सांगितले.

पाणी फाउंडेशनचे फिल्ड ऑफिसर बालासाहेब चव्हाण यांनी फार्मर कप स्पर्धे 2026 मध्ये तालुक्यातील जास्तीत जास्त गटाणे सहभाग नोंदवावा.स्पर्धेच्या शंभर गुणांकनांची सविस्तर माहिती त्यांनी शेतकऱ्यांना दिली. गटाने बक्षीस पत्रतेसाठी प्रयत्न करावा असे आवहान त्यांनी केले.

महादेव निपाणी यांनी या स्पर्धेत प्रथम पारितोषिक 50 लक्ष द्वितीय पारितोषिक 30 लक्ष आणि तृतीय पारितोषिक 20 लक्ष त्याचप्रमाणे वैयक्तिक महिलांसाठी 10 लाखाचे बक्षीस असल्याचे यावेळी सांगितले.विविध एस.ओ.पी ची अंमलबजावणी केल्यास आपल्याला बक्षीस पात्रास मदत मिळेल.असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. या कार्यक्रमाला पवन खंदारे, गजानन फुपाटे,वैभव देशमुख,भारत राठोड, समाधान देशमुख,गोविंद सानप, गौतम दहिजे,प्रकाश दाहिजे,विकी चव्हाण,शंकर कोकाटे,बंटी कोकाटे, धनंजय जाधव,विजय राठोड इतर गटातील शेतकरी आणि परिसरातील अनेक नागरिकउपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन रयत शेतकरी गटाचे अध्यक्ष अविनाश राठोड यांनी केले.

# दिवा शहरात 'एकता स्क्रॅप असोसिएशन'ची स्थापना

## मान्यवरांच्या सदिच्छा भेटी घेत कार्याला सुरुवात



महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)** : दिवा शहरातील काही प्रतिष्ठित नागरिकांनी एकत्र येत सामाजिक आणि व्यावसायिक हितासाठी 'एकता स्क्रॅप असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली आहे. श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अंतर्गत या असोसिएशनची अधिकृत नोंदणी (क्रमांक: २२८९/२०२६) पूर्ण झाली असून, संस्थेने आपल्या कामकाजाला जोमाने सुरुवात केली आहे.

असोसिएशनच्या स्थापनेनिमित्त आणि नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी परिसरातील विविध क्षेत्रांतील दिग्गज मान्यवरांची सदिच्छा भेट घेतली. यामध्ये प्रामुख्याने: रमाकांत मढवी (माजी उपमहापौर तथा नगरसेवक), शैलेश पाटील (नगरसेवक), ॲड. आदेश भगत (नगरसेवक), अनिल शिंदे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस ठाणे), सचिन भोईर (अध्यक्ष-भाजपा दिवा मंडळ) या मान्यवरांनी असोसिएशनच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शहरातील कायदा, सुव्यवस्था आणि व्यावसायिक समन्वय राखण्याच्या दृष्टीने अशा संघटनांची भूमिका महत्त्वाची असल्याचे मत या प्रसंगी व्यक्त करण्यात आले.

'एकता स्क्रॅप असोसिएशन'चे )कार्यालय दिवा (पूर्व) येथील मुंब्रादेवी कॉलनी, विष्णुदादा अपार्टमेंट येथे असून, या माध्यमातून स्थानिक स्क्रॅप व्यावसायिकांच्या अडीअडचणी सोडवणे आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे, हा मुख्य उद्देश असल्याचे सदस्यांकडून सांगण्यात आले.

या सदिच्छा भेटीदरम्यान असोसिएशनचे अनेक सभासद आणि स्थानिक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहराच्या विकासात आणि सामाजिक उपक्रमांत यापुढेही असोसिएशनचा सक्रिय सहभाग राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वारकरी संस्कार शिबिर म्हणजे विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासाचे माध्यम – जयेश शेलार



महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर**

**वाडा** - वारकरी पद्धतीचे गायन, वादन, योगाभ्यास, संस्कृत पठण यांसह विद्यार्थ्यांसाठी अन्य आवश्यक असणाऱ्या गोष्टी वारकरी संस्कार शिबिराच्या माध्यमातून शिकवल्या जात आहेत. त्यामुळे ही शिबिरे विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासाचे माध्यम ठरत आहेत, असे प्रतिपादन कुर्मी महासभेचे प्रदेश महासचिव जयेश शेलार यांनी केले आहे.

वाडा तालुक्यातील केलठण येथील सरस्वती पाटील विद्यालयात ज्ञानोबा तुकोबा वारकरी संस्थेच्या माध्यमातून 14 दिवशीय वारकरी निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना जयेश शेलार यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या जगात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच मनःशांती, स्वयंशिस्त, सुसंवाद आवश्यक आहे तसेच वारकरी संप्रदायात अंधश्रद्धेला थारा नाही. मुलांमध्ये जगण्याची निकोप दृष्टी तयार होते. त्याचप्रमाणे मुलांना आज मोबाईलपासून दूर ठेवणे गरजेचे आहे. यासाठी पालकांनी मुलांना वारकरी संस्कार शिबिरात पाठवले पाहिजे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

या शिबिराचे आयोजन ज्ञानोबा तुकोबा वारकरी संस्थेचे अध्यक्ष राजेश महाराज बांगर यांनी केले असून सोमवार दिनांक 4 रोजी या शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम पार पडला.

यावेळी सेवानिवृत्त बँक अधिकारी नारायण पाटील, माजी पं.स. उपसभापती प्रतिभा पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पाटील, नरेश राऊत, पुष्कर रोडगे, दीपेश पष्टे, किरण जाधव, कल्पेश भोईर, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश माळी, साळुंखे महाराज, संतोष देसले यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# माध्यमिक व उच्च माध्यमिक फणसगाव विद्यालयाचा बारावीचा शंभर टक्के निकाल

महाराष्ट्र जीत

**फणसगाव (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)** : फणसगाव पंचक्रोशी शिक्षण संस्था मुंबई संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय फणसगाव या विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला

**कला शाखा 100% निकाल**

कला शाखेत एकूण 32 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यातील 32 विद्यार्थी उत्तीर्ण झालेत

वाणिज्य शाखा 100% निघतात

वाणिज्य शाखेत एकूण 49 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यातील 49 विद्यार्थी उत्तीर्ण झालेत

**कला शाखा**

प्रथम क्रमांक- शुभम मच्छिंद्रनाथ मिठबावकर -71.33%




द्वितीय क्रमांक - पूर्वा प्रशांत यादव -60.67%

तृतीय क्रमांक - सुरज अनिल सावंत-60.00%

**वाणिज्य शाखा**

प्रथम क्रमांक- प्रेरणा प्रमोद घाडी -79.33%

द्वितीय क्रमांक - मनस्वी महेश नर -76.00%

तृतीय क्रमांक - पूर्वा उदय गुरव -75.50

या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाहक, कोषाध्यक्ष,कार्यकारणी सदस्य मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.


# रायगड अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचा महापूर

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव वार्ताहर पनवेल कळंबोली प्रतिनिधी–** शाळेच्या परिक्षा संपून लागलेल्या सुट्ट्या आणि महाराष्ट्र दिनाची सुट्टी, त्याला शनिवार-रविवार असा सलग तीन दिवसांचा सुट्टीचा योग, तसेच शाळांच्या सुट्ट्या या दुहेरी संधीमुळे रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाली आहे.

अलिबाग, किहीम, आवास, सासवणे, वरसोली, नागाव, चौल, रेवदंडा, काशिद, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर या किनाऱ्यांवर हजारो पर्यटक दाखल झाले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यासह राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने रायगडकडे वळले आहेत.

उन्हाचा कडाका वाढला असला तरी समुद्राच्या थंडगार पाण्यात डुंबत पर्यटकांनी उकाड्यावर मात करण्याचा आनंद घेतला. विशेषत: लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत होता.



समुद्रस्नानासोबतच एटीव्ही राईड्स, बोटिंग, सागरी सफर, घोडेस्वारी आणि उंट सफारी यांचा पर्यटकांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि लॉजेस फुल्ल झाल्याचे चित्र दिसून आले. स्थानिक पर्यटन व्यवसायिकांसाठी ही गर्दी 'सुगीचे दिवस' ठरत असून, पर्यटन हंगाम अशा सलग सुट्ट्यांमुळे अधिकच बहरत असल्याचे दिसते. एकूणच, सुट्ट्यांचा फायदा घेत कुटुंबासह बाहेर पडण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे चित्र असून, रायगडचे किनारे पुन्हा एकदा पर्यटकांच्या गर्दीने गजबजले आहेत. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेले माथेरानही पर्यटकांनी गजबजून गेले आहे.

**तीन दिवसात २ लाखांहून अधिक पर्यटक दाखल**

जिल्ह्यत गेल्या तीन दिवसात दोन लाखांहून अधिक पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. अलिबागमध्ये मुंबईतून जलमार्गाने दाखल होणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. दर शनिवार रविवारी गेट वे ते मांडवा दरम्यान १० हजार प्रवाश्यांची ये-जा होत असते, यात गेल्या दोन दिवसाच जवळपास दुपटीने वाढ झाल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाच्या सुत्रांकडून देण्यात आली आहे.

सलग सुट्ट्यामुळे अलिबाग तालुक्यात ५० हजार पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. मुरुड तालुक्यात १५ ते २० हजार माथेरान येथे १५ ते २० हजार श्रीवर्धन तालुक्यात ३० ते ३५ हजार पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज आहे. ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्याही लक्षणीय रित्या वाढली आहे.

> "दिवाळीत गावी गेल्यामुळे फिरायला जाता आले नव्हते. आता सलग सुट्ट्या आणि मुलांच्या शाळांना सुटी लागल्याने आम्ही अलिबाग-मुरुडला दोन दिवसांसाठी आलो आहोत. मुलांनी इथे खूप मजा केली."
> – मनोज देशपांडे, नाशिक

सुट्टी तील वाढत्या पर्यटकांच्या संख्येनी सोयी सुविधांवरचा ताण वाढला

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे अर्थकारणाला चालना मिळाली असली तरी पायाभूत सुविधांवरील ताण कमालीचा वाढला आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणच्या रस्त्यांवर सलग दोन दिवस वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. वाहनांची संख्या अभूतपूर्व पध्दतीने वाढल्याने, वाहतून नियमन करणे जिकरीचे ठरत आहे. मुंबई गोवा महामार्ग, अलिबाग वडखळ महामार्ग, दिघी माणगाव महामार्ग आणि अलिबाग मुरुड मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामळे पर्यटक तासंतास अडकून पडत असल्याचे चीत्र पहायला मिळत आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# आर्यारवी एंटरटेनमेंटच्या चौथ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात "सात बारा", "साथ" आणि "जागा" यांनी मारली बाजी

महाराष्ट्र जीत

**मुंबई:(केतन भोज) :** लघुपटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात यावर्षी प्रथम पुरस्कार रोख रक्कम रुपये 15000/- म्हणुन कै.भिकाजी महादेव तेटांबे, कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ पारंबी प्रॉडक्शन आणि भक्ती प्रॉडक्शन निर्मित "सात बारा', द्वितीय पुरस्कार रोख रक्कम रुपये 10000/- म्हणुन (स्टार इंजिनिअरिंग एन्ड मेकॅनिकल सर्विसेस) एअर कंडीशनिंग एन्ड रेफ्रिजरेशन सिस्टम जॉब यांच्या सौजन्याने बटवा फिल्म्स "साथ" तर तृतीय पुरस्कार रोख रक्कम रुपये 5000/- म्हणुन कै.सावित्रीबाई गुणाजी कोकाटे यांच्या स्मरणार्थ







बटवा फिल्म्स "जागा" यांनी पटकावली आहेत. त्याचप्रमाणे उत्तेजनार्थ लघुपट पुरस्कार रोख रक्कम रुपये 1000/- म्हणुन कै.गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ "साकव" आणि "चुना




तंबाखु" यांना प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे कै.शामराव नारायण व्हटकर, कै.हौसाबाई शामराव व्हटकर यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख रक्कम रुपये 1000/- आणि पुरस्कार अक्षय वासकर (दिग्दर्शन-सात बारा), राहुल यशोद,अक्षय वास्कर (कथा,पटकथा,संवाद लेखन-सात बारा), मकरंद पांचाळ (छायाचित्रण-जागा), स्मित भगत (बाल कलाकार-चुना तंबाखू), पिंटू पाटील (अभिनेता-सात बारा), श्रेयस भिंगार्डे (संकलक-साकव), शीतल कुलकर्णी (अभिनेत्री-सात बारा), पवन वडूरकर (संगित-सात बारा) इत्यादींना प्रदान करण्यात आले. लघुपट परीक्षणाची सर्वोत्तम जबाबदारी प्रसिद्ध लेखक,दिग्दर्शक अनंत सुतार आणि प्रसिद्ध अभिनेते मकरंद पाध्ये यांनी बजावली. चित्रपट, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळ्याला विशेष झळाळी प्राप्त झाली होती. या महोत्सवात गझल नवाज भीमराव पांचाळे, ज्येष्ठ अभिनेते,दिग्दर्शक सतीश पुळेकर, ज्येष्ठ रंगकर्मी, नाट्य अभिनेते, दिग्दर्शक के राघव कुमार आणि ज्येष्ठ समाजसेवक,पत्रकार प्रभाकर तोडणकर या दिग्गजांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले: कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळ्याची मंगलमय सुरुवात झाली. आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (AV) माध्यमातून या सोहळ्याचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी गझल गाऊन उपस्थित मान्यवर आणि रसिकांची दाद मिळवली. यावेळी रंगकर्मी, समाजभूषण आणि कलाभूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, समाजसेवक सुनिल शिर्के, अभिनेत्री सिद्धी कामथ, गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक-दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, "चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो; त्याला स्वतःला किंमत नसते, पण दुसऱ्यासोबत जोडला तर त्याची किंमत वाढते. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच हा प्रवास इथवर पोहोचला आहे." राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या अधिसूचनेचे अमित जाधव यांच्याकडून स्वागत

## सार्वजनिक विश्वस्त कायद्यात मोठा बदल ; न्यायालयाऐवजी धर्मादाय आयुक्तांना अधिकार

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** Maharashtra Public Trusts (Second Amendment) Act, 2025 अंतर्गत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून, सार्वजनिक ट्रस्टच्या कारभारात न्यायालयाऐवजी आता धर्मादाय आयुक्तांना (Charity Commissioner) अधिक अधिकार देण्यात आले आहेत. या दुरुस्तीमुळे ट्रस्टच्या व्यवस्थापन प्रक्रियेत मोठा बदल होणार आहे.

नवीन तरतुदीनुसार, कोणत्याही ट्रस्ट डीड, स्कीम, आदेश किंवा न्यायालयाच्या निर्णयामध्ये "Civil




Court / District Court" असा उल्लेख असला, तरी तो आता "Charity Commissioner" असा मानला जाणार आहे. त्यामुळे ट्रस्टसाठी स्कीम तयार करणे किंवा त्यात बदल करणे, ट्रस्टी नियुक्त करणे तसेच अध्यक्ष किंवा पदाधिकारी म्हणून कार्य करणे हे सर्व अधिकार आता धर्मादाय आयुक्तांकडे राहणार आहेत.

या दुरुस्तीचा उद्देश ट्रस्ट व्यवस्थापन अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करणे हा आहे. पूर्वी अशा बाबींसाठी न्यायालयात जावे लागत असल्याने वेळ आणि खर्च वाढत होता. आता ही प्रक्रिया प्रशासनिक पातळीवर पूर्ण होणार आहे. शासनाने काढलेल्या अधिसूचनेनुसार या दुरुस्तीतील अधिसूचना दिनांक १ मे २०२६ पासून लागू करण्यात आले असून, त्यामुळे संबंधित बदल आता प्रत्यक्ष अमलात आले आहेत.


याच अधिसूचनेला अनुसरून विश्वस्त व्यवस्था सरकारच्या ताब्यात असावी अशी मागणी विधी व न्याय विभागाकडे सप्तशृंग निवासिनी ट्रस्ट च्या विश्वस्तांच्या निवडी विरोधात उच्च न्यायालयात याचिका टाकलेले अमित जाधव यांनी केली होती

याबाबत जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या निर्णयाचे स्वागतच केले आहे व विधी व न्याय विभागाचे मंत्री माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप जी घुमरे साहेब यांचे आभार मानले आहे

# 7 मे रोजी एस. टी आरक्षणासाठी एल्गार

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती मध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र शासनाने 3महिन्या पूर्वी अभ्यास समिती नेमली. समिती स्थापन होऊन तीन महिने उलटूनही समितीचे कामकाज ठप्प आहे शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश भाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आदेशाने 7 मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी 300 ठिकाणी जिल्हाधिकारी तहसीलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालय मार्फत निवेदन देण्यात येणार आहे बार्शीटाकळी तालुक्यात बंजारा समाज व विविध संघटना व गोर सेनेच्या वतीने 7 मे रोजी 2026 वेळ 11






अकोला गोर सेना जिल्हा अध्यक्ष कुलदीप भाऊ चव्हाण

वाजता कार्येकर्ते तहसील समोर एकत्र जमणार आहे तेथून शांततेने शिस्तीत मोर्चाने जाऊन तहसीलदार भाषण टाकळी यांना निवेदन देणार आहे बार्शीटाकळी तालुक्यातील सर्व बंजारा बांधव गोरसेना कार्यकर्ते आरक्षण समर्थकांनी सात मे रोजी सकाळी 11 वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान गोरसेनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप चव्हाण यांनी केले

# पिक विमा मंजूर करून तात्काळ देण्याची मागणी

## रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांची आग्रही मागणी

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी :** रिसोड वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्याला पिक विमा भरपाई मिळण्या पासून वगळण्यात आले आहे. सरकारचे व पिक विमा कंपनीच्या या धोरणामुळे रिसोड तालुक्यातील शेतकरी पिक विमा भरपाई पासून वंचित राहणार आहेत अगोदर या वर्षी खरीप 2025 मध्ये अतिवृष्टी झाली या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले शेतकऱ्यांना शेतीमध्ये काहीच उत्पन्न झाले नाही शेतकऱ्यांनी खरीप हंगामामध्ये मुदतीपूर्वी आपला पिक विमा हप्ता भरून पिक विमा काढला

अगोदरच आर्थिक परिस्थितीने डबघाईस आलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा मिळेल अशी आशा होती परंतु आता हा पिक विमा भेटला नाही तर आपल्या समोरील आर्थिक व्यवहार कसे चालवावे असा मोठा प्रश्न शेतकऱ्यासमोर आहे पिक विमा तारखे अगोदर काढून व नुकसान झाल्यावर नुकसान भरपाई मिळत नसेल तर तो पिक विमा काढून काय फायदा असा प्रश्न शेतकऱ्याकडून उपस्थित होत आहे शासनाने व विमा कंपनीने यावर तात्काळ विचारविनिमय करून तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करावा व तात्काळ द्यावा अशी आग्रही मागणी शेतकऱ्याकडून होत आहे

# अभिनेत्री अक्षता कांबळी पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित

## सिंधुदुर्ग पालक मंत्री नितेश जी राणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र जीत

**ओरस (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** १ मे महाराष्ट्र दीन तसेच सिंधुदुर्ग जिल्हा स्थापना दीन या दिवशी हा पुरस्कार सिंधुदुर्ग नगरी पोलिस कवायत मैदान येथे प्रदान करण्यात आला.अभिनेत्री अक्षता कांबळी गेली काही वर्षे महिलाना व्यासपीठ उपलब्ध करून देत महिलांचा आत्मविश्वास वाढवत समाजकार्य करत आहेत.त्यांच्या कार्याची दखल घेऊन महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य शासन विभाग सिंधुदुर्ग यांच्या वतीने शासनाचा २०२०-२१ चा *पुण्य



श्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र,रु .१० हजार १ चा धनादेश असे पुरस्कार चे स्वरूप आहे.त्यासाठी सर्व स्तरातून कांबळी यांच्यावर अभिनंदन शुभेच्छा चा वर्षाव होत आहे .असे पुरस्कार मिळाले की आपली समाजासाठी काम करण्याची जबाबदारी वाढत आहे .असे कांबळी यांनी मालवणी भाषेत मनोगत व्यक्त करत सांगितले.तसेच जिल्हा महिला बाल विकास महाराष्ट्र राज्य शासन अधिकारी व कर्मचारी यांचे मनापासून आभार मानले.

# स्व.अशोक आप्पाजी पसारकर यांच्या स्मृतिपित्यर्थ बुद्ध विहाराला कपाट व पुस्तके भेट

## अभिजीत पसारकर यांनी जपली वडिलांची सामाजिक बांधिलकी


महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** स्थानिक केकतउमरा येथील सर्वसमावेशक व्यक्तिमत्व स्वर्गीय अशोक आप्पाजी पसारकर यांच्या 22 एप्रिल रोजी स्मृतिपित्यर्थ त्यांचे चिरंजीव अभिजीत पसारकर यांनी त्यांच्याच वडिलांची सामाजिक बांधिलकी जोपासत बौद्ध विहाराला एक कपाट भेट दिले.व 23 एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिना निमित्त पुस्तके भेट दिलेली आहेत.खऱ्या अर्थाने अशोक आप्पाजी पसारकर यांना गावाबद्दल गावातील नागरिकांबद्दल जी आपुलकी जो जिव्हाळाप्रेम होतं हे कशातही मोजता येत नाही. गोरगरीब जनतेच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे अप्पाजी आज आपल्यामध्ये नाहीत.पण त्यांची उणीव मात्र आज जरूर भासते. अप्पाजी यांनी आपल्या संपूर्ण हयातीमध्ये गोरगरीब जनतेची काम केलेले आहे.यामध्ये निराधार महिलांना शासनाचे अनुदान मिळवून देण्यासाठी पंचायत समिती तहसील याच्या वारंवार चकरा मारून आज रोजी गावातील अनेक निराधार तसेच ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या अनुदान मिळवून देण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे.त्यांचा आणि माझा प्रत्यय मी जेव्हा तलाठी साहेब यांचे सोबत होतो.तेव्हा ते नेहमी तलाठी कार्यालयामध्ये येत असत कुणाचा उत्पन्नाचा दाखला,तर कुणाचा हयातीचा दाखला,तर कुणाचा वयाचा दाखला यासाठी ते दररोज कुणाचे ना कुणाचे काम घेऊन तलाठी कार्यालयामध्ये येत असत. तेव्हा या सगळ्या कामासाठी मी त्यांना नेहमी मदत केलेली होती.त्याचबरोबर



तलाठी यांचे सोबत माझ्या अगोदर गजानन घोडे हे देखील होते. त्यांनी देखील वरील सांगितल्याप्रमाणे आप्पाजी यांना लागत असलेले कोणतेही दाखले बिनधास्तपणे देऊन देऊन गावातील ज्येष्ठ नागरिक व निराधार लोकांना मदत केलेली आहे. स्वतःसाठी काही न मागणारा हे व्यक्तिमत्व गावातील लोकांच्या समस्या घेऊन लोकांच्या अडचणीचे निवारण करून खऱ्या अर्थाने एक सर्वसमावेश व्यक्तिमत्व म्हणून आप्पाजी यांच्याकडे पाहल्या जात होते.स्वर्गीय अशोक आप्पाची आज आपल्यामध्ये नाहीत याची निश्चित उणीव आहे.त्यांचाच सामाजिक कार्याचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांचे चिरंजीव अभिजीत पसारकर,सारंग पसारकर हे पुढे घेवून जात आहेत. याचा प्रत्यय दिनांक 22 एप्रिल रोजी स्वर्गीय अशोक अशोक आप्पाजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आलेला आहे.त्यांनी बौद्ध विहारात विद्यार्थ्यांना






स्पर्धा परीक्षांची तसेच महामानवांची तसेच इतरही पुस्तके भेट दिलेली आहे. ही भेट खरंतर कुठल्याच पैशामध्ये मोजता येत नाही. अशी ही अमूल्य भेट अभिजीत पसारकर यांनी दिल्यामुळे खरोखर स्वर्गीय अशोक आप्पाजीच्या सामाजिक कार्याची जाणीव झाली. अभिजीत पसारकर यांचे संपूर्ण बौद्ध उपासक,उपासिका, तथा पंचशील क्रीडा मंडळ यांचे वतीने खूप खूप आभार व त्यांच्या सामाजिक कार्याला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.आणि पुन्हा एकदा स्वर्गीय. अशोक आप्पाजी पसारकर यांच्या स्मृतिला विनम्र अभिवादन.

# दारव्हा येथे बाल श्रामणेर शिबिर संपन्न

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे** : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा यवतमाळ (पश्चिम) च्या मार्गदर्शनाखाली तालुका शाखा दारव्हा चे वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुद्ध जयंतीचे औचित्य साधून दिनाक 27 एप्रिल 2026 रोजी बंजारा हॉल (कविता मंगल कार्यालयाजवळ) येथे बाल श्रामणेर शिबिराचे सायंकाळी 7 वाजता थाटात उद्घाटन झाले.

या उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी तालुका शाखा दारव्हा चे अध्यक्ष प्रा. सिद्धार्थ गायकवाड होते, तर उद्घाटक म्हणून यवतमाळ जिल्हा शाखेचे संघटक मा. प्रदीप नगराळे सर (दिग्रस) उपस्थित होते. या शिबिराचे आचार्य धम्मगुरु पू. भंते मोग्गलायन, केंद्रीय शिक्षक म्हणून मा. रविंद्र दारोकार गुरुजी (अकोला) पूर्ण 5 दिवस उपस्थित राहणार आहे.

या उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात, बुद्ध आणि बाबासाहेब यांच्या प्रतिमेला माल्यापर्ण आणि दीप प्रज्वलित करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सुरुवातीला बुद्ध वंदना घेण्यात आली. उद्घाटक प्रदीप नगराळे यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणातुन आजची समाजाची परिस्थिती आणि अशा




प्रकारच्या संस्कार शिबिराची गरज यावर अनेक उदाहरणे देऊन प्रकाश टाकला त्यानंतर पूजनीय भंते मोग्गलायन आणि केंद्रीय शिक्षक रविंद्र दारोकार गुरुजी अकोला यांनी उपस्थित शिबिरार्थींना चिवरदान विधी संपन्न केला.यावेळी संस्थेच्या वतीने सर्व शिबिरार्थ्यांना वही - पेन वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा. डॉ.प्रशांत बागेश्वर यांनी केले. पाच दिवस चालणाऱ्या या बाल श्रामणेर शिबिरासाठी भोजनदानाची व्यवस्था सर्व सन्माननीय वसंतराव मनवर मानकिनी, प्रा. गौतम मनवर दारव्हा, पपेश्वर तायडे तरनोळी इत्यादी मान्यवरांनी केला. सकाळचा अल्फोहार आयु. हरीश गायकवाड, आयु. राजूभाऊ मनवर, आयु. डॉ. बी.के. पंडित आणि डी.वाय. खडसे यांच्याकडून तर फलहार आयु. नितीन भगत आयु. संतोष खडसे आयु. शालिग्राम गवई आणि महिला मंडळ दारव्हा यांच्याकडून प्रदान करण्यात आला

या शिबिराचा सांगता समारोह दि.१ में २०२६ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी संपन्न झाला. सकाळी 8 वाजता बालश्रमणेर भिकूंची रॅली सोबत समता सैनिक दल (महिला व पुरुष) आणि इतर बौद्ध उपासक उपासिकांची रॅली दारव्हातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. समारोपीय प्रसंगी यवतमाळ जिल्हा शाखा पश्चिमचे संस्कार विभागाचे उपाध्यक्ष आयु. राहुल राऊत उपस्थित होते त्यांनी बदलत्या काळामध्ये अशाप्रकारे अशा प्रकारच्या संस्कार शिबिराची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी शिबिरातील काही बाल श्रामनेरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या समारोप या कार्यक्रमांमध्ये केंद्रीय शिक्षक रवींद्र दारोकार गुरुजी पू. भंते मोगालायन यांनी आपले विचार व्यक्त केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सिद्धार्थ गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रशांत बागेश्वर तर आभार प्रदर्शन प्रा. अरविंद मनवर यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. सिद्धार्थ गायकवाड, प्रा. डॉ. प्रशांत बागेश्वर, प्रा. अरविंद मनवर, राजू मनवर, डी वाय खडसे, संतोष खडसे, शालिकग्राम गवई, प्रा. घुंगरराव, नितीन भगत, वंदनाताई ढेरे, नंदाताई पाटील, प्रा. गौतम मनवर, वाकपांजार सर, साहेबराव इंगोले, निळू भाऊ इंगळे, देविदास धवणे, प्रा. डॉ. खुशाल ढवळे महेंद्र कुमार अगमे, महेश चक्रे, सम्यक इंगळे, त्याचप्रमाणे महिला व पुरुष समता सैनिक दलाचे सर्व कार्यकर्ते, महिला मंडळाच्या महिला कार्यकर्त्या यांनी अथक परिश्रम घेतले..

# मान्सूनपूर्व तयारीला गती देत यंत्रणांनी १५ मे पूर्वी कामे पूर्ण करावीत – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** मान्सूनपूर्व तयारीला गती देत सर्व यंत्रणांनी समन्वयाने व काटेकोर नियोजनाने काम करावे, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात मान्सूनपूर्व आढावा सभा घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक लता फड, वाशिम तहसीलदार निलेश पळसकर,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यात संभाव्य पूरस्थिती, अतिवृष्टी तसेच नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. पाटबंधारे व जलसंधारण विभागाने तातडीने ॲक्शन प्लॅन तयार करावा, तसेच प्रकल्पस्थळी आवश्यक खबरदारी घेऊन बॅरिकेटिंग करावे, असे स्पष्ट निर्देश दिले.

आपत्ती व्यवस्थापनासाठी वितरित करण्यात आलेले साहित्य सुस्थितीत आहे की नाही याची खातरजमा करून त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक (ड्रिल) घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. बाहेरून येणाऱ्या नद्यांच्या पाण्यामुळे जिल्ह्यात आपत्तीजनक परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी संपर्क अधिकारी नेमून त्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शाखेत सादर करावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदेकडे



हस्तांतरित झालेल्या तलावांची सविस्तर माहिती सादर करावी, तसेच वायरलेस सुविधा तात्काळ सुरू करून आपत्ती काळात संदेशवहनासाठी ती कार्यान्वित ठेवावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.परिवहन विभागाने जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळांची पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करावा, असेही यावेळी त्यांनी सांगितले. नालेसफाईची कामे तातडीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, ड्रेनेज व्यवस्था सक्षम ठेवावी, पूरप्रवण भागांची ओळख करून आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, तसेच धरणे व तलाव पातळीवर सतत निरीक्षण ठेवावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.आरोग्य विभागाने साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी पुरेसा औषधसाठा, फॉगिंग मोहीम, स्वच्छता व जनजागृती कार्यक्रम राबवावेत. आपत्कालीन रुग्णसेवा अखंडित राहण्यासाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत,वीज वितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने देखभाल-दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून सेवा अखंडित ठेवावी, तर आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्ती व्यवस्थापनाच्या बाबतीत स्वयंसेवी संस्थांचे चांगले सहकार्य आजपर्यंत मिळाले असून पुढेही असे सहकार्य मिळावे.अशी अपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य

महाराष्ट्र जीत

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.

त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या



प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.

आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या काळात 'मेरिट' या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.

आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली 'समान संधी' ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.

तथापि, आजच्या काळात सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीत अनेक आव्हानेही आहेत. आरक्षण धोरणांवर राजकीय हस्तक्षेप वाढला आहे, काही ठिकाणी त्याचा गैरवापरही होत असल्याची टीका केली जाते. 'क्रीमी लेयर', आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, खाजगी क्षेत्रातील आरक्षण यांसारखे अनेक नवीन प्रश्न उद्भवले आहेत. या सर्व प्रश्नांचा विचार करताना शाहू महाराजांच्या मूलभूत तत्त्वांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षण ही केवळ सवलत नसून, ती ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याची प्रक्रिया आहे.

आजच्या समाजात 'मेरिट' या संकल्पनेभोवतीही मोठा वाद आहे. काहीजण आरक्षणाला गुणवत्ता कमी करणारे मानतात, तर काहीजण ते सामाजिक समतेसाठी आवश्यक मानतात. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, संधी मिळाल्याशिवाय कोणतीही गुणवत्ता विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे आरक्षण आणि मेरिट हे परस्परविरोधी नसून, आरक्षणामुळेच खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकसित होऊ शकते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक आणि सामाजिक विषमता नव्या स्वरूपात पुढे येत आहेत. तंत्रज्ञानामुळे काही नवीन संधी निर्माण झाल्या असल्या, तरी डिजिटल दरी, शैक्षणिक असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दिलेला समतेचा संदेश आजच्या बदलत्या काळातही मार्गदर्शक आहे.

शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

आजच्या भारतात समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. शिक्षण, आरक्षण, स्त्रीसक्षमीकरण, आर्थिक विकास आणि सामाजिक ऐक्य या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक प्रगत आणि समतावादी बनू शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, हीच खरी लोकशाही आहे. शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तनासाठी धाडस, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपणही समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**